. महाराष्ट्र शासन .

# नोंदणी व मुद्रांक विभाग

सत्यमेव जयते

## सह दुय्यम निबंधक वर्ग 2

### उल्हासनगर 3 अंबरनाथ

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

⬇

**नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, कोकण विभाग, ठाणे**

⬇

**सह जिल्हा निबंधक वर्ग 1 ठाणे ग्रामीण**

⬇

**सह दुय्यम निबंधक वर्ग 2 उल्हासनगर 3**

**मी सह दुय्यम निबंधक वर्ग 2 श्रीमती भाविका भगवान पाटील**

**महाराष्ट्र शासनाच्या 100 दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा विषेश मोहीमे अंतर्गत खालील प्रमाणे अहवाल सादर करीत आहे.**

# 1.संकेतस्थळ

- नोंदणी व मुद्रांक विभागाचे संकेतस्थळ www.igrmaharashtra.in हे आहे.सदर संकेतस्थळ सर्वांसाठी गुगल सर्च मध्ये उपलब्ध आहे. वापरण्याकारीता सहज सोपे व विभागाबाबत अद्ययावत माहिती पुरवते.
- नोदणी विभागामार्फत रोज हजारो दस्तांची नोंदणी केली जाते व त्याबाबत ची माहिती रोजच्या रोज संकेतस्थळावर प्रकाशीत केली जाते.
- माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी बाबत माहिती नोटीसबोर्ड वर प्रदर्शीत करण्यात आलेली आहे.तसेच 17 मॅन्युअल अंतर्गत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
- लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत पुरविल्याजाणऱ्या सेवा कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.



# 2.केंद्र शासनाशी सुसंवाद

- सह दुय्यम निबंधक उल्हासनगर 3 या कार्यालयात नोंदणी झालेल्या 30 लाख व त्यावरील किंमतीच्या खरेदी विक्री व्यवहारांची माहिती SFT व्दारे आयकर विभागाकडे प्रत्येक आर्थीक वर्षाकरिता दाखल करण्यात येते
- केंद्र शासनाच्या विविध विभागाकडुन ( आयकर विभाग) प्राप्त पत्रांवर वेळीच कार्यवाही करुन आवश्यक माहिती व आवश्यकता असेल तीथे दस्ताच्या प्रती पुरविण्यात येतात.

# 3.स्वच्छता

- सह दुय्यम निबंधक उल्हासनगर 3 हे कार्यालय दिनांक 1/10/1995 पासुन सुरू झालेले आहे. 1/10/1995 ते  15/2/2002 पर्यंत नोंदणीची मॅन्युअली छापिल व फोटो पध्दती प्रचलीत होती.  तसेच त्यानंतर  15/2/2002 ते  / 7/2012 पर्यंत नोंदणीची संगणकीय सरीता प्रणाली प्रचलीत होती. व 2012 पासुन आज पर्यंत  आय सरिता प्रणाली कार्यान्वित आहे. त्यानुसार सर्व अभिलेख वर्षनिहाय अभिलेख कक्षात जतन करणेत आलेले आहेत.
- मुदत बाहय  अभिलेख नष्ट करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.
- जड वस्तु संग्रह नोंदवही अदयावत ठेवणेत आलेली आहे.प्राप्त झालेल्या सर्व जड वस्तुंची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली आहे.
- जुन्या व निरूपयोगी जड वस्तुंची यादी मान्यते करीता सादर करणेत आलेली आहे.

# 3.1 अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण

सह दुय्यम निबंधक उल्हानगर 3 या कार्यालयातील

1. “अ” - वर्ग कायमस्वरूपी अभिलेख लाल रंगाच्या कपडयात बांधून ठेवणेत आलेला आहे.
2. “ब” - वर्ग 30 वर्ष मुदतीचे अभिलेख हिरव्या रंगाच्या कपडयात बांधून ठेवणेत आलेला आहे.
3. “क” वर्ग 5 वर्षे मुदतीचे अभिलेख पीवळया रंगाच्या कपडयात बांधून ठेवणेत आलेला आहे.

# पुर्वीचे अभिलेख









# आताचे अभिलेख

फोटो “ब” व नोटीस ऑफ इंटीमेशन “अ” अभिलेख





छापील “अ” अभिलेख

संगणकीय “ब” अभिलेख





संगणकीय “ब“ अभिलेख

# स्वच्छ सुंदर माझे कार्यालय



दस्त नोंदणी कक्ष



अभ्यगत कक्ष

# 4. तक्रार निवारण

- आपले सरकार पोर्टलवरील 100 % तक्रारी निकाली करणेत आलेल्या आहेत.
- पी.जी. पोर्टलवरील 100 % तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.
- अभ्यगत भेटीचा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावणेत आलेला आहे.
- लोकशहीदिनामध्ये आजपर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

# 5. कार्यालयीन सोई सुविधा

- कायमस्वरूपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याकरीता (pure it) पाणी स्वच्छता यंत्र बसवण्यात आले असुन पाणी थंड होण्याकरीता Blue Stra कंपनीचे थंड पाण्याचे यंत्र बसविण्यात आले आहे.
- कर्मचारी व अभ्यगत महिला व पुरूष यांचेसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सुविधा करण्यात आलेली आहे.




पुरूष प्रसाधन




महिला प्रसाधन

# 5.1 कार्यालयीन सोई सुविधा

- अभ्यगतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालयात बसण्यासाठी खुर्च्या ठेवण्यात आलेल्या आहेत तसेच प्रतिक्षालयात टेलीव्हीजन लावणेत आलेला आहे. थंड व शुघ्द पिण्याचे पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था करण्यात आलेली आहे.







# कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक,दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण










# 6.कामकाजातील सुधारणा

- नोंदणी व मुद्रांक विभागाचे कामकाज सन 2002 पुर्वी मॅन्युअली पध्दतीने होते.
- 2002 पासुन या विभागात अनेक बदल झाले असुन आज रोजी दुय्यम निबंधक कार्यालयाचे संपुर्ण कामकाज संगणकावर आय सरिता प्रणाली अन्वये होते. त्यामुळे अमुलाग्र बदल झालेला आहे. उदा. 2002 पुर्वीचे मुळ दस्त नोंदणी पुर्ण करुन छायाचित्रण कार्यालय पुणे येथे फोटोकरीता पाठविले जात होते. त्यामुळे मुळ दस्त परत मीळण्याकरीता विलंब लागत होता. परंतु आज रोजी सदर मुळ दस्त नोंदणी करुन सुची क्र.2 चे प्रतीसह त्वरीत परत दिला जातो. तसेच सदर दस्त शोध घेण्याकरीता त्वरीत संकेतस्थळावर ई-शोध या सदराखाली उपलब्ध होतो.



# 7.अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण,सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- दुय्यम निबंधक श्रेणी 1 या पदावर नव्याने नियुक्त दुय्यम निबंधक यांना या कार्यालयामार्फत प्रशिक्षण देण्यात आले. व प्रमाणपत्र देण्यात आले.

- कार्यालयातील सर्व कर्मचारी, संगणक ऑपरेटर यांना कृत्रीम बुघ्दीमत्ता तंत्रज्ञानाचा (AI) चा वापर करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

# 8. नाविन्युपूर्ण उपक्रम 1-सुकर जीवनमान

- नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत 18 प्रकारच्या online सेवा पुरविल्या जातात. सदर सेवांपैकी 1 सेवा म्हणजे e-search (शोध).
- कोणत्याही व्यक्तीस आपल्या मालमत्ते बाबत शोध घ्यावयाचा असल्यास प्रत्यक्ष दुय्यम निबंधक कार्यालयात अर्ज सादर करुन कार्यालयात सुची क्र2 च्या पुस्तकात शोध घ्यावा लागत होता .
- यात आज रोजी कार्यालयात न येता विभागाच्या संकेतस्थळावर ई-शोध सदराखाली मिळकतनिहाय अथवा दस्त क्रमांक निहाय शोध घेता येतो.
- तसेच आवश्यकता असेल त्यावेळी दस्ताची प्रत आवश्यक फी जमा करून online Download करता येते.या सुविधेचा अनेक लोक,वकील,व्यवसाईक लाभ घेतात.

# 9. नाविन्युपूर्ण उपक्रम 1-सुकर जीवनमान

- नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत पुरविल्या जाणऱ्या 18 सेवांपैकी दुसरी सेवा म्हणजे ई-नोंदणी
- सदर सेवे पैकी दुसरी सेवा ज्या अन्वये लीव्ह ॲन्ड लायसेन्स दस्तांची नोंदणी केली जाते. यात यापुर्वी लीव्ह ॲन्ड लायसेन्स चे दस्त नोंदणी करीता पक्षकारांना दुय्यम निबंधक यांचे समक्ष हजर राहून दस्त करुन दिला व घेतला बाबत कबुली देणे आवश्यक होते. व त्यानंतरच दस्तांची नोंदणी पुर्ण केली जात होती.
- आज रोजी लीव्ह ॲन्ड लायसेन्स चा दस्त नोंदणी करीता पक्षकारांना नोंदणी कार्यालयात समक्ष हजर राहाण्याची आवश्यकता नाही.ऑनलाइन पध्दतीने पक्षकारांना त्यांचे रहाते घरातुन दस्त नोंदणी पुर्ण करणे शक्य झाले आहे. या सुविधेचा लाखो लोकांना फायदा झाला असुन सदर लीव्ह ॲन्ड लायसेंन्स चे दस्त नोंदणीकरिता ऑनलाइन पाठविण्याकारीता 24 तास सेवा उपलब्ध असल्याने हजारो लाखो लोकांनी याचा लाभ घेतला आहे. व या पुढे ही घेत रहातील.

# 10.नाविन्यपुर्ण उपक्रम 2- कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

- सह दुय्यम निबंधक उल्हासनगर 3 या कार्यालयात येणाऱ्या पक्षकारांसाठी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या Online सेवा बाबत माहीती व्हावी व त्यांचा लाभ घेता यावा या करिता 1 संगणक संच उपलब्ध करुन देण्यात आलेला असुन त्यास Wi-Fi सुविधा जोडुन देण्यात आलेली आहे.
- तसेच या कार्यालयात येणाऱ्या स्तनदा माता यांचे करीता स्वतंत्र हिरकणी कक्ष बनविण्यात आलेला आहे. त्यात बैठक व्यवस्था करणेत आलेली आहे.


धन्यवाद